बा.वा.
नों.क्र. २६३

# अिटकू पिटकू

भाग २

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. : २६३

26 APR

## शैलजा राजे

BVBK-0400263

बालवाडी प्रकाशन

किर्लोस्कर प्रेस, पुणे ९

✠ बालवाडी प्रकाशन : ५

✠ अिटकू-पिटकू : भाग २
✠ शैलजा राजे

✠ ऑगस्ट १९७६

✠ किंमत : रु. २–५०

✠ ह्या आवृत्तीचे सर्व हक्क प्रकाशकाधीन

✠ मुखपृष्ठ व आतील चित्रे
श्रीनिवास प्रभुदेसाअी, मुंबअी

✠ मुद्रक – प्रकाशक
श्री. मु. शं. किर्लोस्कर
किर्लोस्कर प्रेस
वीर सावरकर नगर, पुणे– ९

अिटकू-पिटकू स्टुडिओत

अिटकू-पिटकू काळ्याबाजारात

अिटकू पिटकू वाघाच्या पिंजऱ्यात

अिटकू-पिटकू आकाशवाणीवर

वाचनालय शाखा.
वा. क्र. दिनांक
विषय क्र.
BVBK-0400263

# अिटकू-पिटकू स्टुडियोत

अिटकू-पिटकू आता बरेच हुशार झाले होते. त्यांच्या सबंध उंदीर-जातीत त्यांच्याअेवढं हुषार कुणी नाही असं त्यांचा मामा नेहमी म्हणायचा. मामाला आपण आवडतो हे या लबाड जोडीला चांगलं माहीत झालं होतं. त्यामुळे मामा आला की अिटकू-पिटकू फारच शहाण्यासारखे वागत. आअीनं काही सांगायच्या आधीच पटपट आअीचं काम करीत. मामा दुरून येताना दिसला की ते दोघं पटकन घरात शिरत. मामाची येण्याची वेळ बहुधा निवांत दुपारची. तो मुळी नेहमी म्हणायचाच, " मला हीच वेळ बाहेर पडायला सोयीची वाटते, बघ ताअी ! अग, यावेळी बहुतेक सारी मांजरं ढाराढूर झोपलेली असतात. कुणी चुलीशी, तर कुणी गादीवर."

"हो बाबा ! एवढं मात्र खरं हो ! पण आमच्या घरा-



तली ही मनी..."

"मनी काय आपल्या घरात राहते ?" अिटकू आओीला मध्येच अडवीत विचारी.

"गप बस रे, अिटक्या ! अलीकडे किनओी दादा, हे दोघं भारी द्वाड होत चालले आहेत. जरा ऐकत नाहीत बघ !"

"आओी, मी नाही हं ! मी सगळं तुझं औकतो हं ! हा अिटक्याच रे मामा. आता त्याला ओवढं नको का कळायला, आपल्या घरातली म्हणजे बाळाच्या घरातली ते!"

पण मामाला हा वाद वाढवायचा नसे. तो अिटकूला आणि पिटकूलासुद्धा जवळ घेई. त्यांचे कान आपल्या शेपटीनं कुरवाळी. आणलेला खाऊ आपल्या हातांनी त्यांना भरवी. आपल्या बहिणीला म्हणे, "ताओी, तू भारीच चिडतेस बुवा या अिटक्या-पिटक्यावर ! अग, आपल्या आख्ख्या अुंदीरजातीत ओवढी हुषार आणि गोड चुरचुरीत पोरं शोधून सापडायची नाहीत. समजलीस?"

यावर अिटकू-पिटकूची आओी आपले कान अुडवीत म्हणे, "माहीत आहे मला. तूच भारी लाडावलं आहेस त्यांना. म्हणून तर मामा आला की स्वाऱ्या अगदी खूष !"

आपल्या आओीलाही आपला अभिमान वाटतो हे अिटकू-पिटकू जाणून होते. तिचा हा लटका रागही त्यांना समजत होता. ते कुंचूं कुंचू--चूंचूं करीत हसायचे आणि मामाच्या अंगावर चढून बसायचे. त्याला सगळ्या गंमतीजंमती सांगण्याची त्यांना अगदी घाई होई.

कधीकधी मात्र त्यांना वाटायचं, मामा दुपारी येण्यापेक्षा सक्काळीच का नाही येत ? कारण दुपारी त्यांना बाहेर हुंदडायला

खूपच आवडायचं. डुलक्या खाणाऱ्या मोत्याला हळूच डिवचायचं, कुठल्यातरी गादीच्या कोपऱ्यावर झोपलेल्या मनीच्या अंगावर भिंतीवर चढून काहीतरी पाडायचं, नाहीतर सैपाकघरात दाणे अुशाशी घेअून झोपलेल्या काकूंचे दाणे पळवायचे ! असे अेक ना दोन कितीतरी उद्योग त्यांना दुपारी करायला आवडायचे. पुष्कळ वेळा बाळही घरात असायचा. मगतर काय—मजाच मजा व्हायची. तो सगळी खेळणी काढून बसायचा. कधीकधी त्याचे दोस्तही जमलेले असायचे. ते पुष्कळ वेळा बाळाची कूकगाडी काढायचे आणि रुळ लावून चालवायचे. या आगगाडीची अिटकू—पिटकूला खूपच गंमत वाटायची. गाडी गोलगोल फिरायची न् तिच्याभोवती अिटकू—पिटकू.त्या लहानलहान मुलांना अिटकू-पिटकू फारच आवडायचे, आणि अिटकू—पिटकूला ती मुलं !

त्यामुळे कधीकधी मामा दुपारी येअू नाही असं त्यांना वाटत असलं तरी मामाला पाहताच मात्र ते बाकी साऱ्या गोष्टी दूर सारायचे आणि मामाच्या स्वागताला धावतपळत बिळात शिरायाचे. अगदी शहाण्या अुंदरांसारखे, मामा दुरून दिसला की ते धावत घरात शिरायचे. कागद, चिंध्या वगैरे कुरतडून त्यांनी करून ठेवलेला कचरा ते भराभर गोळा करायचे. दोघं मिळून मामाला बसायला काहीतरी आणून द्यायचे. आअी काही काम करीत असली तर लगेच तिला मदत करायला सज्ज व्हायचे.

त्यांचं हे असं वागणं पाहिलं की आअी आपली अर्धी शेपटी धसकन् जमिनीवर आपटायची. त्यांचे थरथरणारे कान पकडून म्हणायची, "का ? अेवढा का हा साळसूदपणा ? काय कुठं धाड घालून आलाय आणखी ? नसते अुपद्व्याप बाअी तुमचे ! "

आओीचं हे असलं बोलणं संपायच्या आतच मामा बिळाच्या आतल्या दाराशी आलेला असे. तो दाराशीच थांबून मोठ्यानं विचारी, "काय ताओी, येअू का आत?

"अरे, हे काय विचारणं झालं? ये की–"

"नाही ग, तुझा अेवढा पारा चढलाय. म्हटलं, आपणही जपून असावं. का तू या गुणी पोरांवर अेवढी चिडत असतेस काही कळत नाही बुवा!"

"गुणी? दादा, अरे, तुला यांचे अेकेक पराक्रम माहीत नाहीत म्हणून बोलतो आहेस असा. मोठी द्वाड कार्टी आहेत ही. त्यांना सांभाळता सांभाळता थकते मी!"

"होय रे पोरांनो? आता आणखी काय केलंत?"

"कुणी? आम्ही? नाही बुवा! आम्ही तर घरातच होतो. या अिटक्यानं केर काढला–"

"हो, आणि तोवर पिटक्यानं आओीला कोथिंबीर निवडून दिली. छे रे मामा! आम्ही तर हल्ली घरातच असतो. किती दिवसांत कुठं गेलोच नाही आम्ही! हो किनअी ग आओी?"

"किती दिवसांत कसले! हे आत्ताच तर घरात शिरलाय. यांचा अेक तास म्हणजे अेका मिनिटाचा आणि दिवस म्हणजे पाव तासाचा! असलं गणित आहे बाबा या दोन पोरांचं!"

हा आणि असलाच संवाद बहुतेक आओीचा आणि मामांचा अिटकू-पिटकूला अैकायला यायचा. आपली आओी पुष्कळ वेळा तेच ते बोलते हे अिटकू-पिटकूला माहीत होतं. कधीकधी ते आओीची त्यावरून चेष्टाही करायचे. पण मामाच्या समोर मात्र ते गप्प असायचे. मामा आपले लाड करतो हे त्यांना ठाअूक होतं.

पण त्याला आओची चेष्टा केलेली आवडणार नाही हेही त्यांना ठाऊक होतं. म्हणूनच मामा आला की ते अगदी शहाण्या अुंदर सारखं वागत. आओ थोडी फार रागावली तरी अैकून घेत. आपण ममाला आवडतो. हे आवडणं कायम राहिलं पाहिजे असं त्याना म्टायचं. मामाही त्यांचा फारफार लाडका होता.

त्या दिवशी मामा आला तो काहीशा गडबडीतच. आओनं किती आग्रह केला तरी त्यानं गूळदाण्याचा लाडू खाल्ला नाही. म्हणाला, "आता मला मुळीच वेळ नाही. फार घाओत आहे मी!"

"अरे पण अेवढा लाडू खायला कितीसा वेळ लागणार बरं, अेवढा खोबऱ्याचा तुकडा तरी मोड."

"नको ग ताओ! माझं पोट अगदी गच्च भरलंय. मोठी मेजवानी होती शेजारच्या स्टुडिओत – "

"स्टुडिओत ? म्हणजे काय रे मामा ? "

अिटकूच्या या प्रश्नावर पिटकू मोठ्यानं हसला. अिटकूनं त्याच्या पाठीत एक रट्टा मारला न् तो म्हणाला, "ही ही करायला काय झालं? तुला तरी आहे का माहित, स्टुडिओ म्हणजे काय ते ?"

"मग ? तुला काय वाटलं, मी काय बुद्दू आहे होय तुझ्यासारखा ! स्टुडिओ म्हणजे फोटो काढतात ते घर. हो किनओ रे मामा ? "

" थोडंसं खरं आहे पिटक्या तुझं. पण हा मी म्हणतो तो स्टुडिओ नुसताच फोटो काढण्याचा नाही. म्हणजे त्याचं काय आहे, तिथे फोटो काढतात. पण ते हलते, बोलते, चालते फोटो. आणि मग ते लोकांना दाखवतात. त्यांना म्हणतात सिनेमा, चित्रपट ! "

" आयला, सिनेमा होय ! तो तर मी पाहिलाय. "

" अिटक्या, अिटक्या काय बोललास ? अगदी कसं रे वळण नाही तुम्हाला. कसल्या शिव्या देता या ? "

" हॅं! कमालच आहे आओी तुझी ! आयला ही काय शिवी आहे होय ? विचार हवं तर मामाला– "

" काही नको त्याला विचारायला. तो आहे गडबडीत. अेवढासा लाडू का खोबऱ्याचा तुकडा खायला त्याला वेळ नाी अेवढी कसली लगीनघाओी आहे कुणास ठाऊक ! "

" रागवू नकोस बुवा ताओी. तशी लगीनघाओीच आहे म्हणेनास. आत्ताच आमच्या शेजारचे ते भुरके–"

" म्हणजे ते असे खूप जाडे आणि भुरकट रंगाचे आहेत तेच काय ? त्यांच्या दोन मुलांना म्हणे बोक्यानं खाल्लं मध्ये-तेच का ? "

" हो, हो ! तेच. ती मुलंही तसली बावळट होती. आमची ही जोडी बघ ! बाकी काही म्हण ताओी, या पोरांची सर नाही कुणाला यायची. "

मामाच्या या बोलण्यानं ही जोडगोळी मोठी खुलली. अेक, मेकांकडे पाहात त्यांनी आपले गोलगोल डोळे मिचकावले. शेपटीनं एकमेकांच्या पाठीवर थापा मारल्या आणि ते दोघं मामाच्या दोन्ही बाजूस अुभे राहिले, मामाच्या कोटाशी खेळत.

आओी आपल्या भावाकडे आणि मुलांकडे कौतुकानं पाहात म्हणाली,

" तुझं हे भाच्यांचं कौतुक पुरे झालं. तू त्या भुरक्यांचं-काय सांगत होतास ? "

“काही नाही ग ! त्याच गडबडीत आहे मी.”

“त्याच म्हणजे कुठल्या ?”

“अग, आमचा तो शेजारचा स्टुडिओ आहे ना, तिथं म्हणे, आज मोठमोठे नट-नटचा येणार आहेत.”

“नट-नटचा ? म्हणजे ?”

“पिटक्या मघाशी मला हसलास नाही का ? आता का ? बाळाच्या खोलीत तो राजेश खन्नाचा फोटो मी अेकदा पाहिला होता.”

“हां ! हां ! आता आठवलं. हेमामालिनीचा पण आहे. मामा ते दोघं येणार आहेत का रे ? काय चिकणे आहेत रे ते दोघं ! मी येऊ का तुझ्याबरोबर ?”

“तू ? फार गडबड असणार पण तिथं. मोठी पार्टी आहे म्हणे त्यांना.”

“त्या पार्टीला जाणार आहेस तू मामा ?”

“हो ! मुद्दाम भुरके म्हणाले म्हणून जाणार आहे–”

“मामा, मी पण येणार बरं का ! मला पण सगळे सिनेमा-वाले बघायचे आहेत. काय छानछान कपडे असतात, माहीत आहे त्यांचे? बाळाची ताअी आहे नं, बरं का मामा, ती ना मामा, अभ्यासाच्या पुस्तकात या सिनेमावाल्यांची पुस्तकं ठेवते न् वाचत वाचत झोपते. अेकदा मी तिच्या गादीवरून अेक फोटो पळवलाय. दाखवू तुला ?”

“नको ! नको ! आत्ता मला खरंच वेळ नाही. मी पुन्हा येअीन तेव्हा पाहीन. जाऊ मी ?”

आअीनं परवानगी दिली आणि मामा परत फिरला. हे

कसलं मामाचं येणं ? अिटकू–पिटकू आज मामावर रागावले. आपण स्टुडिओत जाणार आहोत, पार्टी खाणार आहोत आणि चिकणे नट-नटी अस्से अगदी जवळून पाहणार आहोत हेच सांगायला का हा आला होता ? आम्हाला चिडवायला ?

अिटकू–पिटकू जागच्याजागी धुसफुसत अुभे होते. हे काही खरं नव्हतं. मामा तिकडे स्टुडिओत जाणार, सगळी मजा करणार आणि आपण अिथंच हे असे या घरात बसून राहणार ? दोघांनी अेकमेकांकडे पाहिलं. दोघांच्याही मनात अेकच विचार होता. काय वाट्टेल ते झालं तरी स्टुडिओत जायचंच. मामाचं घर त्यांना माहीत होतं. तिथपर्यंत तर जाऊ या ! मग पुढची बात पुढं !

" अिटक्या "– पिटकूनं हळूच हाक मारली,

" बोलू नकोस. ठरलं. आपण निघायचं, आत्ताच. "

अिटकू–पिटकूनं आतल्या बाजूला पाहिलं. आअी मक्याचं कणीस सोलण्यात गढून गेली होती. तिचं अिकडं–तिकडं कुठंच लक्ष नव्हतं. अिटकू–पिटकू हळूच बाहेर निसटले. आता सारं सोपं होतं. मामाच्या घराची वाट त्यांना माहीत होती. या घराच्या बिळातून बाहेर पडायचं की सू पळत दुसऱ्या कंपाअुंडात शिरायचं. अन् तिथून हौदाच्या बाजूनं निघायचं की एका भिंतीवर चढायचं. त्या भिंतीवरून अुडी मारली की एकदम मामाच्या घराशी.

मामा घरात पोचला असेलनसेल तोच ही जोडगोळी मामीपुढं दत्त म्हणून अुभी राहिली. मामी त्या दोघांना पाहूना चित्कारली, " ची ! ची ! अग बाअी, हे मला बोलले नाहीत ते कुठं तुम्ही आल्याचं ! "

" चू चू ! मामी ! अग, मामाला मुळी माहीतच नाही आम्ही आल्याचं. आम्ही गुपचूप पळून आलोय. अे मामी, प्लीज, आम्हाला स्टुडिओत नेअून पोचव ना ग ! "

अिटकू–पिटकू मामीजवळ लाडात येऊन बोलले.

मामीनं त्या दोघांना कुरवाळीत म्हटलं, " अस्से लबाड आहात रे दोघं. तुमचे मामा हे नुकतेच गेले. त्यांच्याच बरोबर नाही का मग जायचं ? "

" नाही ग! मामाला विचारलं तर तो 'नाही' म्हणाला."

" काय बाई तरी ! नेलं असतं पोरांना तर काय झालं असतं ? जरा मजा वाटली असती त्यांना ! चला मी नेते. पण मी दुरूनच दाखवीन हो तो स्टुडिओ. "

" चालेल, चालेल. पुढचं आमचं आम्ही पाहू. "

मामीनं अिटकू–पिटकूला स्टुडिओच्या दाराशी सोडलं. दाराशी खूपच मोटारी अुभ्या होत्या. फुलांच्या रंगी–बेरंगी माळा लावल्या होत्या. अिटकूनं पिटकूला हळूच विचारलं, " काय रे, लग्न–बिग्न आहे का काय कुणाचं ? "

" असेल बुवा ! कारण हल्ली खूप नट–नटच्या लग्न करताहेत. परवाच बाळाची ताअी आणि दादा म्हणत होते. "

" लग्न असेल तर मजाच होईल रे. आपल्याला लाडू-जिलब्या खायला मिळतील.

" अिटक्या, तुझा हावरेपणा काही कमी होत नाही. आता आपण आलोय ते आधी सगळं पाहू या ! "

" बरं ! बरं ! अुगाच भांडण काढू नकोस अिथं. अे, ते बघ, तिकडं बघ. काय मजा आहे. बघ ना ! "

"आयला! खरंच रे! यंदा पाऊस पडला नाही म्हणून बाळाच्या आओीनं दरवर्षीसारखी भाजी, काकड्या लावल्या नाहीत. आपल्याला काही या वर्षी कोवळी काकडी नाही खायला मिळाली. आणि अिथं बघ, काय छान कोकळ्या कोवळ्या काकड्या आहेत. चल, पळ तिकडे. त्या गडबडीत कुणाचं लक्षच नसणार आपल्याकडे."

अिटकू-पिटकू पळाले ते त्या कोवळ्या काकडीवर तुटून पडले. अेकेक चावा घेतला न् त्यांनी ती काकडी थुंकून टाकली. तेवढ्यात त्यांच्या अंगावर केवढातरी प्रकाश पडला. कुणीतरी ओरडलं, "ओह, व्हॉट ए नॅचरल शॉट! काय सुरेख आहे ही जोडी!"

पण अिकडे अिटकू-पिटकू मात्र बिथरले होते. 'ही काय पद्धत झाली! असल्या प्लास्टिकच्या काकड्यांचं शेत असं अिथं पसरून ठेवायची गरजच काय होती या लोकांना? आम्हाला फसवतात काय?' अिटकू-पिटकू तिथून जोरात पळाले. समोरच एक छानसा हिरवागार डोंगर त्यांना दिसला.

"पिटकू, आपण त्या डोंगरावर जाऊ. चल, छान दिस-तोय. मअूशी हिरवळ असेल!"

अिटकू आणि पिटकू उड्या मारीत-मारीत निघाले. आपल्या मागून कुणी येतंय याचा त्यांना मुळीच पत्ता नव्हता. ते दोघं मोठ्या अैटीत, डोंगरावर चढायला गेले तो काय तो अेक कापडाचा तुकडा होता.

"अिटक्या या इथल्या सगळ्या गोष्टी अशाच खोट्या दिसता हेत रे! छे! अुगाच अेवढी धडपड केली. कसली मामाची पाट-

न् कसलं काय ! ते काजू बेदाणेसुद्धा नकलीच असणार ! चल जाअू या परत !"

"पण तो राजेश खन्ना आणि–"

"कसलं काय घेअून बसला आहेस अिटक्या! ते तरी खरे असतील का नाही कुणास ठाअूक ! ते आणि त्यांचं चिकणेपण पाहून का आपलं पोट भरणार आहे? त्यापेक्षा घरी चल. आअी अुगाच काळजी करीत असेल."

"आणि होय रे, आपण आलो तेव्हा ती मक्याचं कणीस सोलत होती. दाणे काढून आपली वाट पाहात असेल बिचारी!"

अिटकू-पिटकूनं हातात हात घातले न् ते निघाले. अिकडे-तिकडे न पाहता ते सरळ स्टुडिओच्या दाराबाहेर पडले, आतून कुणीतरी म्हणालं, "अरे, हीच वाटतं मघाची अुंदरांची जोडी ! फार छान शॉट घेतला म्हणे त्यांचा ! त्यांना काही दिलं का नाही ?"

अिटकूनं मागे वळून पाहिलं. पण पिटकूनं त्याचा कान ओढीत म्हटलं, "अिटक्या, आपल्याला काहीसुद्धा नको आता. पहिला घरी चल."

तरीपण अिटकू मागे फिरला. कुणीतरी त्यांच्या बाजूनं बिस्किटांचा पुडा फेकला होता. अिटकू फिरला म्हणून पिटकू फिरला. तो बिस्किटांचा पुडा घेअुन दोघांनी घर गाठलं. दारातूनच आअीला बिस्किटं दाखवीत ते ओरडले, "आअी, आम्ही सिनेमात काम केलं ना म्हणून ही बिस्किटं दिली बघ आम्हांला."

आअीनं क्षणभर आपल्या दोन्ही पिल्लांकडे कान ताठ करून पाहिलं. आणि मग आपल्या तुटक्या शेपटीने अेकेक रट्टा

देत ती ओरडली, "कारट्यांनो, आता सगळे उद्योग पुरे झाले म्हणून हे आठवलं होय तुम्हाला? थांबा, येऊ देत त्यांना घरी म्हणजे सांगतेच त्यांना!"

आओीचा धपाटा खाल्लेले अिटकू-पिटकू गपचूप जाऊन झोपले.पण तरीही हळूच अेकमेकांच्या कानात म्हणत होते, "सारं खोटंच नाही रे तिथलं! काय मजा नाही. ही बिस्किटं तरी खरी आहेत का पाहायला हवंय."

पण तसं अुठून पाहण्याचा त्यांना धीर होत नव्हता. कारण त्यांची आओी डोक्याशीच त्यांना थोपटीत बसली होती. मनाशी म्हणत होती, 'भारीच पुंड झालेत हल्ली. मारलं की वाओीट वाटतं मेलं. पण काय करायचं? थोडा धाक हवाच त्यांना! केलं असेल बाओी या पोरांनी सिनेमात काम! त्याशिवाय का कुणी एवढी खुसखुशीत बिस्किटं देतं! आता अुठले की चांगली दोन बिस्किटं खायला देईन!"

अिटकू-पिटकू मात्र हळूहळू काहीतरी बोलत केव्हाच झोपून गेले होते.

## अिटकू-पिटकू

# काळ्या बाजारात

'**बा**हेर मुसळधार पाऊस पडतोय. घरात गुबगुबीत अंगावर घेअून लोळायचं. लहर लागली की काहीतरी झकासपैकी तोंडात टाकायचं– कधी बिस्किटं, कधी दाणे, कधी आणखी काही. खरं तर किती मस्त मजा. पण ही अशी मजा किती दिवस ? अेक-दोन. फार तर तीन ! पण आता जवळजवळ आठ दिवस होत आले होते. बाहेरच्या जगाचं नाव नव्हतं. घरात असं कोंडून राह्यचं म्हणजे किती वात असतो हे या आअीला काय कळणार ? तिला असं घरात बसून राहायला आवडत असेल आम्हाला नाही आवडत. आअी म्हणजेसुद्धा बुवा अेक वैतागच होतो कधी कधी !'

अिटकू-पिटकू अेकसारखे कुरकुरत होते. येते कधी कधी अशी शिक ! त्यात काय मोठंसं ? पण मागच्या आठवड्यात


किराणामाल दुकान
श्रीनिवास

पिटक्याला अेकसारख्या फटाफटा शिंका आल्या न् आअीनं त्या दोघांना हे असं कोंडून ठेवलं. म्हणाली, 'अैकत नाही तुम्ही पोरं! बाहेर चिखलात कशाला रे खेळायला जाता? जरा काटर्चीना घरात बसवत नाही.'

आअी चिडली होती खरी! पण अिटक्या मात्र खी खी हसत होता. पिटक्याला या अशा शिंका का आल्या हे त्याला माहीत होतं. ते दोघं बाळाच्या खोलीत रोजच्या सारखेच खेळत होते. अलीकडे बाळाच्या घरात अेक म्हातारी कामाला ठेवली होती. ती रोज दुपारी बाळाच्याच खोलीत झोप काढायची. अिटकू-पिटकू खेळायला लागले की त्यांना शिव्या द्यायची, हातात असेल ते फेकून मारायची. आता अिटकू-पिटकू चपळ होते आणि तिचा नेम काही धड नव्हता, ही गोष्ट वेगळी! पण म्हणून काय झालं., खरं तर बाळाची खोली म्हणजे त्यांचीच हक्काची खोली होती. बाळ तर ते दोघं दिसले की त्यांना हातातला खाअू द्यायचा. आपण दिलेला खाअू अिटकू-पिटकू खातात हे पाहून बाळाला नेहमीच आनंद व्हायचा. कधी कधी तर अिटकू-पिटकू बाळाच्या हातातलासुद्धा बिस्किटाचा तुकडा किंवा चकलीची नळी घ्यायचे. अेवढी त्यांची गट्टी होती.

पण अलीकडे ही म्हातारी फार भंकसगिरी करीत होती. आपण खुशाल बाळाच्या खोलीत लोळत पडायची. आणि त्यांना मात्र फिरकायचीही तिनं सोय ठेवली नव्हती. अिटकू-पिटकू काही असे डरणारे बच्चे नव्हते. ती झोपली की ते खेळायला तर जातच होते. परंतु तिलाही सतावून सोडायचे. तिच्या पायांना गुदगुल्या करायचे. केस कुरतडायचे. तिचे केस सदा मोकळेच

असायचे. अिटकू-पिटकूला त्यातून धावायला मजा वाटायची.

आणखी अेका गोष्टीवर त्यांचा डोळा होता. तिच्या कमरेला नेहमीच अेक लाल रंगाची पिशवी असायची. त्या पिशवीतून ती पानं काढून घ्यायची. आणि अेक काहीतरी असायचं, अेका डबीत. त्याची ती अेवढीशी चिमूट घ्यायची न् नाकाला लावायची. काय झकास वास यायचा त्यावेळी. ते काय आहे हे त्यांना पाहायचं होतं. त्यासाठी त्यांची नेहमीच धडपड चालायची; पण जमत नव्हतं.

त्या दिवशी मात्र अेकदम सुरेख संधी सापडली. म्हातारी झोपली. चांगली घर्र-घर्र घोरत होती, आणि ती तिची पिशवी तिच्या हातात तशीच राहिली. कमरेला खोचायची विसरली वाटतं म्हातारी. मग अिटकू-पिटकू काय असली संधी सोडतात? दोघांनी मिळून ती पिशवी घेतली, घरात आणली. पान-सुपारीचं त्यांना विशेष नव्हतं. त्यांचं लक्ष होतं ते त्या डबीकडे. डबीचं झाकण गच्च होतं. पिटक्या म्हणत होता, " राहू दे रे. आपण बाबा आले की घेअू अुघडून ! "

पण अिटक्याला धीर नव्हता. त्यानं आपल्या टोकदार दातांनी डबीचं झाकण अुघडलं. मस्त वास आला. चॉकलेटी रंगाची ती कसलीतरी माती होती. पिटक्या हावरा. म्हणाला, " अिटक्या, अरे ही चॉकलेटचीच पूड दिसते. पाहू पाहू ! "

आणि पिटक्यानं पटदिशी आपलं तोंड त्या डबीत खुपसलं. आणि मग छी–छी–छी– ! झाऽऽलं ! अेकामागून अेक शिंका सुरू झाल्या. शिंकून–शिंकून पिटक्या हैराण झाला, आणि नेमकी आअी आली. आअी म्हणजे अगदी हीच– अगदीच भित्री. लाग-

लीच घाबरली. पिटक्याला तुळशीची पानं काय खायला दिली, आलं काय चावायला लावलं. सारंच अेकदम नको ते. पिटक्या तोंड वाकडं करून खात होता आणि अिटक्या हसत होता. पण आअीच्या तावडीतून अिटकूही सुटला नाही. तिनं त्यालाही पिटक्याबरोबर झोपवून ठेवलं.

आता त्या गोष्टीला चांगले पाच-सहा दिवस होअून गेले होते. अुंदराच्या पोरांनी असं एका ठिकाणी राह्यचं म्हणजे कमालच झाली. पाअूस काय कधी पडला नव्हता का पडत नव्हता ?

पण अलीकडे आअी फारच बायकाळली होती. म्हणजे बायका जसं आपल्या मुलांना वागवतात तसंच त्यांना वागवत होती. मध्ये बाळाला सर्दी झाली होती तर त्याच्या आअीनं त्याला असंच झोपवून ठेवलं होतं. डॉक्टर काय आणले होते, औषधं काय पाजली होती. तेव्हा बाळही असाच कंटाळला होता. त्यांना माहीत होतं. त्यावेळी त्यांना बाळाची दया आली होती. ते बाळाशी खेळत होते. गमतीजमती करून दाखवीत होते. बाळ मग हसत होता. चॉकलेट-खारीक असलं काही तरी त्यांना खायला द्यायचा. ते तिघं मग धमाल करायचे.

पण आता ते स्वतःच अडकून पडले होते. काय करावं तेच अिटकू-पिटकूला कळत नव्हतं. आअीचा तर जसा सक्त पहारा होता. अलीकडे त्यांचा कुणी तरी काका अेका डॉक्टरच्या घरात राहायला गेला होता. त्याला आई डॉक्टरच म्हणत होती. तो डॉक्टरकाका सुद्धा त्यांना पाहून गेला. त्यानं कसल्या तरी सोनेरी कागदातल्या गोळ्या त्यांना खायला दिल्या. अिटकू-पिटकूला

बोलताबोलता आओीनं शेपटीनं डोळे पुसायचा प्रयत्न केला. पण तिची तुटकी शेपटी काही डोळ्यांपर्यंत पोचली नाही. आओीच्या डोळ्यांतलं पाणी पाहून अिटकू-पिटकूला फार वाओीट वाटलं. दोघंही पटकन् आओीच्या पाठीवर चढून बसले आणि म्हणाले, "आओी, रडू नकोस. हे आम्ही आत्ता निघालो बाबांना शोधायला–"

"शाबास रे बाळांनो! म्हणूनच तुम्हाला मी अुठवलं. मघाशी मी सहज बाळाच्या खोलीत जाअून आले, तेव्हा बाळाची आओी बाळाला तयार करीत होती. ती म्हणत होती, 'राजा झोपू नकोस हं. आपल्याला सर्कस पाहायला जायचं आहे ना?' ते अैकलं न् धावत आले तुम्हाला अुठवायला–"

"पण आओी, अेवढ्या रात्री जातोय बाळ सर्कशीला?"

"अरे रात्र कसली? आत्ता अवघे नअू वाजताहेत. तुम्हाला सहा नाही वाजले तर झोपा येतात–"

"अग पण आओी, मग रात्री अकरानंतर आपण फिरायला निघतो, म्हणून मग आम्ही आधीच थोडी झोप काढतो–"

"ते सगळं खरं रे! आता जास्त बोलण्यात वेळ घालवू नका. चटकन् मोटारीत जाअून बसा–"

"मोटारीत? जवळ आहे म्हणालीस ना?"

"मला काय माहीत रे बाबा, जवळ का लांब ते? बाळाच्या बाबांनी मोटार बाहेर काढलीय्, म्हणून मला आपलं वाटतं, बाळ मोटारीतून जाणार सर्कशीला."

"बरं, बरं! असूदे. जातो आम्ही. तू मुळीच काळजी करू नकोस. येताना आम्ही बाबांना आणतो कीनअी बघ!" असं

म्हणून अिटकू-पिटकू मोठ्या अैटीत तुरुतुरु चालत मोटारीपर्यंत आले. पण आता आत कसं बसावं त्यांना कळेना. कारण बाळाच्या हातात मनी होती. आणि मोत्या अेक पाय वर करून मोटारीच्या चाकाशीच अुभा होता. त्यांच्यापैकी कोणाला जर का अिटकू-पिटकूची चाहूल लागली तर सगळंच संपलं असतं. अिटकू-पिटकूनं सर्रकन् अेक गिरकी मारली आणि ते मोटारीच्या दुसऱ्या बाजूला आले. तिकडे बाळाचे बाबा होते. अिटकू-पिटकूच्या नकळत त्यांच्या तोंडून आवाज निघाला– "ची-ची–"

मनीनं तो आवाज अैकला मात्र, तिनं गुर्रर्र असा नाकातल्या नाकात आवाज काढला. तरी बरं, बाळानं तिला घट्ट धरलं होतं. अिटकू पिटकूला म्हणाला, "बाळ हे नेमकं आपल्याला हवं तसं करीत असतो ना, म्हणून मला तो आवडतो बघ–"

पिटकूनं नुसतीच मान हालवली आणि न बोलण्याचा अिशारा दिला. मग पिटकू हळूच बाबांच्या दोन पायांमधून निसटला आणि मोटारीत चढला. अिटकूही तसंच करायला गेला पण त्याच वेळेला नेमका बाबांनी पाय अुचलला. त्यांच्या पायाला अिटकूचं अंग लागलं. ते ओरडले, "शी! काय बेडूकबिडूक आलाय का काय गाडीत? जरा टॉर्च आणा बरं–"

हे अैकून पिटकू चांगलाच घाबरला. त्यानं पटकन् गाडीच्या खिडकीच्या फटीत दडी मारली. अिटकू कसातरी गाडीत चढला पण त्याला पिटकू कुठं दिसेना. त्यानं अिकडंतिकडं पाहिलं आणि तो हळूच बाळाच्या स्वेटरच्या घडीत लपून बसला. बाबांनी बॅटरी लावली आणि गाडीत नीट तपास केला. तेवढ्यात बाळाची

आओी बाळाला घेअून मोटारीत चढली. भाअू आला. त्याचा मित्रही होता बरोबर. आओी म्हणाली, "चला आता लवकर, नाहीतर सर्कस सुरू होअून जाओील–"

मोटार सर्कशीच्या तंबूपाशी थांबली आणि अिटकू-पिटकू खाली अुतरले. क्षणभर दोघं भांवावूनच गेले. अबब! केवढातरी मोठा होता तो तंबू! अेवढ्या अफाट जागेत बाबांना शोधायचं तरी कसं? त्यांना काही सुचेना. अिटकू तर भेदरून म्हणाला, "पिटक्या, जाअूया बाबा परत घरी. मला तर भीतीच वाटते."

"अॅहॅरे! भित्री भागूबाओी! आओीजवळ बसून तेवढ्या बाता माराव्यास तू! चल, हो आत. जरा अिकडंतिकडं बघ हुशारीत राहा!"

आता पिटकूला मोठा जोर आला होता. ते आत शिरले तेव्हा सगळा तंबू माणसांनी गच्च भरला होता. ते सरसर, तुर-तुर सरळ मधल्या मोकळ्या जागेत आले. तेवढ्यात अेक बुट-कासा माणूस हातात भलीमोठी शेंगदाण्यांची पुडी घेअून खात-खात आला. शेंगदाण्यांचा कसा खमंग वास येत होता. त्या माण-साची विजार खूपच सैल होती. अिटकू-पिटकू सरळ त्या विजारीच्या पायात शिरले. त्यांच्या नखांनी त्यांनी त्या बुटक्याला गुदगुल्या करायला सुरुवात केली. तो टणाटण अुड्या मारायला लागला. लोक हसायला लागले. 'विदूषक, विदूषक' म्हणून ओरडायला लागले. त्याच्या अुडी मारण्यानं अिटकू-पिटकू थेट त्याच्या हातातल्या पुडीपर्यंत पोचले. त्यांनी पुडीवर अुडी मारली. सगळे शेंगदाणे खाली सांडले. अिटकू-पिटकू पटकन् खाली अुतरले आणि भरा-भर शेंगदाणे खाअू लागले. मुलं टाळ्या पिटीत ओरडली, "अरे,

या सर्कशीत अुंदीरदेखील आहेत बरं का ! बघा, बघा, कसे अुड्या मारून दाणे खाताहेत. गंमतच आहे मोठी–''

तो सगळा गोंगाट अैकून अिटकू-पिटकू अगदी भांबावून गेले. दाण्याचा मोह तर त्यांना सोडवत नव्हता. तेवढ्यात अेक माकड तिचाकीवरून आलं. या भागाबाअीला अेकदा त्यांनी बाळाच्या अंगणात पाहिलं होतं. अिटकू पिटकूला म्हणाला, " पिटक्या, या भागाबाअीची मजा करूया का रे ? त्या दिवशी ती कशी छान नाचली होती, तसं नाचायला लावूया हिला–''

अिटकूची ही कल्पना पिटकूला अेकदम पसंत पडली. त्या विदूषकाचा तांबडा रुमाल खाली पडला होता, तो त्यानं अुचलला आणि तो भागाबाअीच्या सायकलवर अुडी मारून बसला. त्यानं तो रुमाल त्या भागाबाअीच्या तोंडावर टाकला. मध्येच हे काय झालं ते त्या माकडाला समजेना. ते ओरडलं. त्याबरोबर अिटकू-पिटकू घाबरले आणि जवळच्या दोरीवरून सरसर वर चढले. तिकडे वर झोपाळेच झोपाळे टांगलेले होते. अेकावर अिटकू आणि अेकावर पिटकू असे दोघं जाअून बसले. वारा आला की झोपाळे हालत. अिटकू–पिटकू मोठ्या खुशीनं झोके घेत होते. ते झोक्याच्या रंगात आले होते तोच भराभर भराभर त्या सगळ्या झोपाळ्यांवर छानछान कपडे घातलेल्या मुली येअून अुभ्या राहिल्या. अिटकूच्या झोपाळ्यावर अेक सोनेरी केसांची मुलगी अुभी होती; तर पिटकूच्या झोपाळ्यावर सफरचंदी रंगाची मुलगी आलेली होती. त्या मुलींकडे पाहून अिटकू–पिटकू मोठ्या प्रेमानं हसले. पण त्या वेड्या पोरींना ते कळलंच नाही. 'अं, अं' करीत अेकीनं दुसऱ्याच अेका झोपाळ्यावर अुडी मारली. अिटकूला

तिच्या अुडीची मोठी गंमत वाटली. तो पिटकूला म्हणाला, " पिटक्या, काय हुशार आहे रे ती मुलगी ! तुला येअील का रे अशी अुडी मारता ? "

" हात्तीच्या ! त्यात काय आहे? ही बघ मी अुडी मारली.' असं म्हणून पिटकूनं जी अुडी मारली ती झोपाळयाला हात धरून खाली लोंबकळणाऱ्या अेका मुलीच्या पायावर! जोरात झोके घेणाऱ्या त्या मुलीला आपल्या पायावर अेकदम काय येअून पडलं कळेना. तिनं पाय झाडला. त्याबरोबर पिटकू जो अुडाला तो अेकदम खाली जाळयावर! पिटकू जाळयावर पडलेला पाहून अिटकूनंही आपलं अंग टाकून दिलं त्या जाळयावर. दोघंही त्या जाळयावर येअून पडले. पण त्यांना भराभर पळता येअीना. त्यांचे पाय जाळीत अडकू लागले. मध्येच पिटकूची शेपूटही अडकली. पिटकू अगदी रडकुंडीस आला. तो अिटकूला म्हणाला, " अिटक्या, बाबांना शोधायचं सोडून आपण अिथं शेंगदाणे खात बसलो ना, म्हणून बरं ही देवानं शिक्षा केलीय् आपल्याला ! "

अिटकूलाही ते पटलं. त्यानं आपल्या दातांनी धडपड करून कशीतरी पिटकूची सुटका केली. पण आता खाली कसं अुतरावं त्यांना कळेना. तेवढयात त्या सगळया मुलींनी भराभर जाळीवर अुडया मारल्या आणि त्या जमिनीवर अुतरल्या. अिटकू–पिटकूंनीही जाळीतून खाली अुडी मारायचा प्रयत्न केला. पण त्यांनी अुडी मारायच्या आतच कुणीतरी जाळी काढून भराभर गुंडाळली. अिटकू–पिटकू त्यात गुरफटले गेले. त्यांच्याभोवती जाळयाचा भलामोठा गुंडाळा तयार झाला. अिटकू–पिटकू चांगलेच अडकले.

गड्यानं अिटकू–पिटकूंसकट ती जाळी दूर कोपऱ्यात फेकून दिली होती. अिटकू–पिटकू अेकमेकांना बिलगून बसले होते. यातून बाहेर पडायचं म्हणजे जाळी कुरतडायला हवी होती. पण ती चांगलीच भक्कम होती. मग हळूहळू हालचाल करीत ते कसे-बसे जाळीच्या बाहेर आले आणि धूम पळाले.

अिटकू–पिटकू पळतापळता मध्येच थांबले. अेक भली मोठी गाडी त्यांच्यासमोर अुभी होती. ते तिच्या चाकावरून तुर-तुर तुरतुर वर चढले. त्यांनी डोकावून त्या गाडीच्या दारातून पाहिलं. अेक खूपच मोठी मनी आपली शेपटी हालवीत-हालवीत पिंजऱ्यात अुभी होती. अिटकू–पिटकूला ती तशी अडकलेली पाहून खूपच मजा वाटली. अेकदा त्यांचे काकाही असेच पिंजऱ्यात अड-कले होते. पण मग बाबांनी मोठ्या युक्तीनं त्यांची सुटका केली होती. आता त्या मनीला पाहून त्यांना त्या गोष्टीची आठवण झाली आणि त्याचबरोबर बाळाचीही. 'या मनीनं तर बाबांना–' कल्पनेनंच अिटकू–पिटकू रडायला लागले. त्यांचा आवाज अैकून त्या मनीनं 'गुर्रगुर्र' आवाज काढला. अिटकू म्हणाला, "पिटक्या, हा त्या वाघाचा आवाज दिसतोय रे. वाघ नाही खाणार बाबांना. वाघ–सिंहांची आणि आपली मैत्री आहे–"

"कुणी सांगितलं तुला ?"

"बाळाची आअी बाळाला सांगताना मी अैकलंय. अेका सिंहाच्या पायातला काटा अुंदरानं काढला होता आणि अेकदा अेका वाघाला जाळ्यातून सोडवला होता. तेव्हापासून मैत्री आहे त्यांची आपल्याशी."

"मग यालाच विचारायचं का बाबांबद्दल?"

पिटकूची ही कल्पना अिटकूला अेकदम पसंत पडली. ते दोघंही सुळ्कन् त्या पिंजऱ्यात शिरले. आणि काय आश्चर्य ! त्यांचे बाबा तिथंच अेका कोपऱ्यात मुटकुळी करून झोपलेले त्यांना दिसले ! अिटकू-पिटकूंना आनंद झाला. ते धावतधावत बाबांकडे गेले.

"बाबा, बाबा, अिथंच काय झोपलायत ? घरी चला. आअी वाट बघतेय. ती केव्हाची काळजी करत जागत बसलेय."

बाबा आळस देत अुठले. आपल्या पिलांना तिथं पाहून त्यांना नवल वाटलं. अिटकू-पिटकूनं सगळी हकीगत सांगितली. त्यावर बाबा हसून म्हणाले, "असं झालं होय ? म्हणजे अेवढा वेळ मी झोपून होतो की काय ? अरे, या वाघाला काहीतरी खायला घातलं होतं, ते मी खाल्लं, अन् मला झोपच लागली वाटतं. बरं झालं, आता तुम्ही आलात म्हणून अुठलो तरी; नाहीतर पुन्हा आपला झोपूनच राहिलो असतो–"

असं म्हणून बाबांनी अिटकू-पिटकूंना शेपटीपाशी धरलं आणि ते भराभरा चालायला लागले. मागच्या मैदानातून गेलेली जवळची वाट त्यांना माहीत होती. बाबा आणि अिटकू–पिटकू घरी आलेले पाहून आअीला खूपच आनंद झाला. ती 'ची, ची–' करीत नाचत सुटली !

अिटकू-पिटकू
# आकाशवाणीवर

उजाडलं नाही तोच अिटकू-पिटकू आओीचा डोळा चुकवून बाळाच्या खोलीत पळाले. काल रात्री बाळाची आओी सिनेमाला गेली होती. त्यामुळं अिटकू-पिटकूच्या आओीबाबांनी सैपाकघरातला अेकूणअेक डबा उघडला होता. अिटकू-पिटकूच्या आवडत्या शंकरपाळ्यांचा जवळजवळ अख्खा डबा बिळात येअून पडला होता. अिटकू-पिटकू शंकरपाळ्या खाअून झोपले होते. रात्रभर धावपळ करून आओीबाबा थकले होते. ते काही अितक्यात अुठणार नाहीत हे या दुकलीला माहीत होतं. 'बाबांच्यापेक्षा आओीच जास्त रागावते. अुगाचच सर्वांना भिते. तिची शेपटी तुटली, म्हणून काय आमची तुटणार आहे?' अिटकू-पिटकूंची ही नेहमीचीच तक्रार होती. आणि नेहमीच आओीचा डोळा चुकवून ते बाहेर पडत होते. हुंदडत होते. बागडत होते.



भरदिवसा बाळाच्या खाऊवर डल्ला मारीत होते. मनीला चकवीत होते. मोत्याला पाठलाग करायला लावून झुकांडी देत होते. स्वयंपाकाच्या आजीला सतावताना तर त्यांना खूपच गंमत वाटायची. ते ची–ची करून हसत सुटायचे.

पण आज अगदी अुजाडलं नाही तोच या स्वाऱ्या बाळाच्या खोलीकडे धावल्या होत्या. वरं झालं, आअी अगदी गाढ झोपली होती. नाहीतर नक्कीच आपल्या तुटक्या शेपटीचा अेक धपाटा मारून तिनं म्हटलं असतं, ‘ कुठं निघालात तडफडत अेवढ्या लौकर ? ती मनी बसली असेल बिळाच्या तोंडाशी! ’

आअीची ही नेहमीचीच भीती. मनी बसायची खरी अशी त्यांच्या घराच्या दाराशी. पण त्यात काय अेवढं भ्यायचं? तिला मस्त चकवता येत होतं त्यांना! अेकानं दाराशी यायचं. चं चूं-चि ची आवाज काढायचा. मनी अगदी जवळ आली की, तिच्या डोळ्यांवर आअीनं घरात आणलेल्या मिरचीची पूड अुडवायची. मनी डोळे चोळत-चोळत बाजूला झाली की, सुर्रकन् पळायचं न् तिला हसायचं, ची–ची चूं चूं !

आज तर काय मजाच होती. आअी अगदी ढाराढूर झोपली होती. न् मनीचा तर कुठं पत्ताच नव्हता. बहुतेक आअी-बाबांचा, मामा-मामीचा, शेजारच्या भुऱ्या काकूंचा पाठलाग करून ती दमली असावी, न् जाअून कोठीच्या खोलीत पोत्यावर झोपली असावी. कुठं का असेना, अिटकू-पिटकू आता कसलाच विचार करणार नव्हते. त्यांना बाळाबरोबर जायचं होतं, आकाशवाणीवर !

काल दुपारी काय झालं, बाळ शाळेतून आला आणि

रोजच्यासारखा खेळायला बाहेर न पडता अेक गोष्ट मोठमोठ्यानं वाचत बसला. खरं तर बाळ असा दुपारी घरी आला की, अिटकू-पिटकू अगदी आनंदानं त्याच्या खोलीत अुड्या मारायचे. कारण मग थोड्या वेळात बाळाचे मित्र गोळा व्हायचे. बाळाची आअी त्यांना कायकाय खाअू द्यायची न् मग अिटकू-पिटकूची चंगळ व्हायची. अेखाद्या भित्र्या मुलाच्या अंगावर टुणकन् अुडी मारली की, त्याच्या हातातली बशी नक्कीच पालथी व्हायची. मस्त मेजवानी मिळायची अिटकू–पिटकूला.

पण काल बाळाचा अेकही मित्र आला नव्हता. अिटकूनं पिटकूला विचारलं होतं, " काय रे आज कुणीच कसं आलं नाही ? आता रे ?"

"अँहँ ! म्हणे आता रे ? कुणी आलं नाही म्हणून काय झालं ? बाळाला तर नक्की खाअू मिळेल. मग बघू काय करायचं ते !"

असं म्हणून पिटकूनं बाळाचा बॉल खेळायला घेतला. पिटकू बॉलवर चढून बसत होता, आणि बॉल घरंगळला की खाली पडत होता. पिटकू पडला की अिटकू तो बॉल पिटकूकडे ढकलत होता. पुन्हा पिटकू चढत होता, पडत होता आणि अिटकू मोठमोठ्यानं हसत होता. अिटकू–पिटकूंची ही मजा पाहता-पाहता बाळ गोष्ट वाचायची विसरला. न् त्यांच्याकडे पाहात हसायला लागला.

गोष्ट वाचण्याअैवजी बाळ अेकटाच का हसत बसला हे पाहण्यासाठी बाळाची आअी दारात आली. तिची चाहूल लागताच अिटकू-पिटकू बॉल टाकून कपाटाखाली लपले. आअीनं दारातूनच बाळाला विचारलं, " का रे, अेकटाच काय हसतो आहेस ?"

" अग आअी, ते दोन अुंदीर ग. त्यांची बघ किती मजा !"

"अुंदरांची मजा बघतोस ? अरे, अुद्या आकाशवाणीवर ना जायचंय तुला ? फजिती का करून घ्यायची आहे तुला ? नीट पाठ करून ठेव ती गोष्ट ! मुळीच अडखळायचं नाही बरं का."

"नाही ग आअी. मी अगदी छान सांगीन गोष्ट. तू अिथं घरी अैक आणि मग बघ पाठ झालीय का नाही ते !"

"बरं बरं ! तुझी पहिलीच वेळ आहेरे माझ्या राजा, म्हणून काळजी वाटते. अुद्या तुझी गोष्ट सगळे अैकणार आहेत हो ! मी सर्वांना कळवलंय."

बाळाचा अैक पापा घेअून आअी परत गेली न् बाळ पुन्हा गोष्ट वाचत राहिला. अिटकू-पिटकू कपाटाखालीच होते. आता त्यांचं लक्ष त्या रंगीत चेंडूकडे नव्हतंच. त्यांचे कान ताठ झाले होते. डोळे लुकलुकत होते. विचार करताकरता अिटकू पिटकूला म्हणाला, " पिटक्या; आकाशवाणी म्हणजे काय रे ? बाळ कुठं जाणार आहे ?"

" मी तोच विचार करतोय रे ! बाळ सिनेमाला जातो, सर्कशीला जातो, बागेत जातो, ते सगळं आपल्याला माहीत आहे. आपण गेलोही आहोत त्याच्याबरोबर. पण आकाशवाणीवर जायचं म्हणजे कुठं जायचं ?"

" बावळटच आहेस. मी तुला विचारतोय, आणि तेच तू काय मला विचारीत बसला आहेस ! हे बघ, मला आकाश माहीत आहे. ते बागेतून दिसतंय बघ !"

" हॅच ! अेवढी हुषारी नको दाखवूस. त्यात काय मोठंसं ? आकाश काय कुणालाही माहीत असतं. मला वाणीही माहीत आहे.

त्याच्याचकडून तर बाळाकडे सर्व सामान आणतात."

" त्यात काय नवल सांगितलंस ? सगळ्याच घरी वाण्याकडून सामान आणतात. मी तर अेकदा मामाबरोबर वाण्याच्या दुकानातही गेलो होतो... काय मस्त काजू होते रे तिकडे. अगदी खुसखुशीत !"

" लागलास का जिभल्या चाटायला ! फारच हावरा बुवा तू ! अिकडे मी विचार करतोय आकाशवाणी म्हणजे काय याचा, अन् तुला आठवताहेत काजू, वाण्याच्या दुकानातले !"

" लागलास का हुषारी दाखवायला ! अे, हे बघ, मला अेक युक्ती सुचलीय. काय रे, आपण जाअूया का बाळाबरोबर ?"

" कुठं ? आकाशवाणीवर ?" पिटकू नवलानं ओरडला.

" का ? काय झालं अेवढं ओरडायला ? आपण कितीतरी वेळा गेलोय की बाळाबरोबर कुठंकुठं !"

" ते खरं रे, पण आकाशवाणी म्हणजे काय हे नको का कळायला ? ते आकाश किती दूर आहे माहीत आहे ना तुला ?"

" वा ! मला भित्रा म्हणताम्हणता आता आपलीच स्वारी लागली की भ्यायला ! ते काही नाही. आपण अुद्या जायचंच !"

" अरे पण कसं ? आणि– आअीचं काय ? तिला कसं सांगायचं ? आधीच अलीकडे ती सारखी रागवत असते."

" पण आपण काही विशेष केलं म्हणजे मग काय म्हणते ते माहीत आहे ना ? हे बघ, आता जास्त विचार नाही करायचा. अुद्या बाळ निघाला की आपण जायचंच. आअीला न सांगता. गुपचूप !"

हे असं ठरलं आणि म्हणूनच आज अुजाडलं नाही तोच अिटकू-पिटकू अुठले न् थेट बाळाच्या खोलीत आले. बाळ अजून झोपलाच होता. काल त्याच्या हातात होते ते कागद त्याच्या टेबलावर दिसत होते. पिटकू सरसर चढला आणि त्यानं त्या कागदावर दोन-चार अुड्या मारल्या. अिटकूनं विचारलं, " काय करतोस रे ? "

" काही नाही, काल बाळाच्या हातात हेच कागद होते. पाहात होतो, त्यात कुठं आकाशवाणी दिसते काय ! "

" ची ची ! " अिटकू हसला. म्हणाला, " हे बघ, आता असलं काही करू नकोस. बाळ तर अजून अुठलेला नाही. आपण अिथंच बसून राहू. बाळ काय करतो ते पाहात. आपली नेहमीची रीत विसरलास वाटतं ? आता बाळावर नीट पाळत ठेव. तो निघाला की आपण...."

" पण काय रे, बाळ सायकलवरून निघाला तर ? "

" अॅ हॅ रे ! शुभ बोल रे नाऱ्याच आहेस ! अुगाच आता नुसत्या शंका-कुशंका काढू नकोस. हे बघ, बाळ आकाशवाणीवर जाणार आहे. जवळ असेल होय आकाशवाणी त्या तीनचाकी सायकलवरून जायला ? अे, ती बघ बाळाची आअी ! "

अिटकू–पिटकू झटकन् वळले न् कॉटखाली जाअून बसले. ही त्यांची नेहमीची जागा ! अिथून त्यांना आपल्या लुकलुकत्या डोळ्यांनी सगळं पाहता येत होतं. आअीनं बाळाला अुठवलं. आज कुरकुर न करता बाळ पटकन् अुठला. पिटकू हळूच अिटकूच्या कानात बोलला, "आज बाळ अगदी शहाणा झालाय बरं का,

आपल्यासारखाच ! "

" होय रे ! आपली आओी कुठं अशी आपल्याला अुठवते ? कधीकधी वाटतं, पिटक्या आपण नेहमी हे असं आओीला फसवून बाहेर पडतो हे बरं नाही. पण काय करणार ! तिला विचारलं तर ती मुळी कधी ' हो ' म्हणतच नाही. बाळाची आओी बघ, स्वतः होअून त्याला आकाशवाणीवर पाठवणार आहे. आपल्या अुंदरांच्या आया फारच भित्र्या बुवा ! "

" अिटक्या, आओीला आपण आकाशवाणीवर गेलो हे कळ-ल्यावर काय वाटेल रे ? पण आपण नीट परत येअू ना ? शेवटी आपल्याला आओी हवीच बुवा ! मग तिची शेपटी तुटकी असू दे, नाहीतर ती भित्री असू दे ! आओीनं रागावल्यानंतर जवळ ओढलं ना, की असं वाटतं."

" चूप ! चूप ! चल तिकडे, बाळ दूध पितोय. बिस्किटं असणार ! अेखादं नेअूया बरोबर, आकाशवाणीवर खायला – "

" खादीशिवाय तुला काय सुचतंय म्हणा ! " असं पिटकू म्हणाला खरा, पण अिटकूच्या आधी तोच अेक बिस्कीट घेअून पळाला. बाळाची तयारी होते तोपर्यंत गाडी घेअून ड्रायव्हर आलाच. गाडीत कसं चढायचं, कुठं लपायचं हे सगळं आता अिटकू-पिटकूला चांगलं पाठ झालं होतं. ड्रायव्हर गाडी पुसत होता. मोत्या त्याच्या पायाशी घोटाळत होता. मनी अून खात डोळे मिटून पडली होती आणि अिटकू-पिटकू खुशाल येअून गाडीत गपचूप बसले होते. अिटकू म्हणाला, " काय रे, पिटक्या, आकाशवाणी म्हणजे खूप लांब असेल नाही रे ? ते बघ ना आकाश किती अुंच दिसतंय– "

"तेच रे! आज रात्री आपण घरी पोचलो नाही तर आओीला

काय वाटेल? घाबरून जाअील रे ती. विचारी रडत बसेल."

"छे रे! त्याची नको काळजी करू तू! बाळ तरी असा रात्रीचा बाहेर राहील काय? आपण नक्कीच परत येअू!"

अिटकूचं हे बोलणं मात्र पिटकूला पटलं. आपल्या शेपटीनं त्याच्या डोक्यावर अेक टप्पल मारीत पिटकू बोलला, "अिटक्या हल्ली भलताच 'स्मार्ट झाला आहेस बरं का! बाकी भाअू कुणाचा?"

"कळली हुषारी! आवाज नको करूस आता. तो बघ बाळ आला. बरोबर ताअी दिसते बरं का!"

गाडीत बसताबसता ताअी बोलली, "आअी, वेळेवर रेडिओ लावायला विसरू नकोसं हं! नाहीतर बसशील काम करीत."

"नाही ग! माझ्या सोनुल्याची गोष्ट मी अैकल्याशिवाय कशी राहीन? राजा घाबरू नकोस हं!"

आअी असं बोलते तोपर्यंत गाडी सुरू झाली. पिटकू हळूच बोलला "काय रे, ही रेडिओची काय भानगड आहे? बाळ निघालाय आकाशवाणीवर, मग तो रेडिओत कसा जाणार? तुला आठवतंय, आपण एकदा रेडिओमागे लपलो होतो, तर मला कसला झटका बसला ते?"

"आठवतं म्हणजे? तुझ्याबरोबर मीही कसला अुडालो होतो! काय रे, मग बाळ रेडिओत गेला, तर आपण काय करायचं?"

"आपण आपले आकाशवाणीवर नाहीतर गाडीतच बसून राहू."

अिटकू-पिटकूंचा हा संवाद चाललाय तो गाडी थांबलीही.

बाळ खाली अुतरला, न् मागून अिटकू–पिटकू ! बाळाच्या ताअीनं बाळाच्या हाताला धरून आत नेलं. अिटकू–पिटकूही हळूच आत शिरले. समोरून येणाऱ्या गृहस्थांनी बाळाला विचारलं, " आलास, सांगणार ना छानशी गोष्ट ? "

हा आवाज अिटकू–पिटकूला ओळखीचा वाटला. पण कुठं अैकला ते मात्र त्यांना आठवेना. तोपर्यंत अेक खोली त्यांना अुघडी दिसली. ते सुटकन् त्या खोलीत शिरले. बापरे ! केवढी गार वाटत होती ती खोली ! अिटकू पिटकूला म्हणाला, " अरे, ती बघ कोणतीशी ताअी बसलीय. पण तिचे डूल पाहिलेस का ? केवढे तरी मोठे आहेत. सगळे कानच झाकून गेलेत. तिची मजा करूया का जरा ? "

असं म्हणून अिटकू त्या हेडफोन्स लावलेल्या मुलीच्या पायावर चढला. ती ओरडली, 'अी!' ती ओरडली ते पिटकूला दुसरी कडूनच अैकू आलं. त्यानं अिकडेतिकडे पाहिलं. तिच्या समोरच्या टेबलावर अेक गोल चकचकीत तबकडी फिरत होती. पिटक्या टेबलावर चढला आणि म्हणाला, " अे, अिटक्या, अरे वर ये ! काय मजा आहे बघ ! गाऱ्यागाऱ्या भिंगोऱ्या खेळूया."

पिटकूचं बोलणं अैकताच अिटकू सरळ त्या ताअीच्या पायावरूनच वर चढला. दोघं त्या गरगरत्या तबकडीभोवती नाचत होते. ओरडत होते. आणि काय मजा, त्यांच्या या हसण्याचा, ओरडण्याचा आवाज त्यांनाच पुन्हा अैकू येत होता. तो पुन्हा येणारा आवाज अैकून अिटकू–पिटकू रंगात आले. पण ती ताअी मात्र ते दोन अुंदीर बघून आपले ते भले मोठे डूल सावरीत बाहेर पळाली, न् अेक माणूस हातात छडी घेअून आत आला. त्याला पाहताच या

दुकलीनं टुणकन खाली अुडया मारल्या. त्या माणसाच्या पायांतून सूबाल्या केला. या स्वाऱ्या बाहेर आल्या तर कुणी तरी त्या माणसाला ओरडत होतं, " काय करता काय तुम्ही? स्टुडिओत अुंदीर शिरतात म्हणजे काय ? आधी बाहेर काढून टाका ते अुंदीर. अुद्या रेडिओवर अुंदरांचा कार्यक्रम होता काय म्हणून विचारतील लोक ! ही आकाशवाणी आहे. कोठीची खोली नाही– "

हे सारं बोलणं अैकत अिटकू-पिटकू जवळच अुभे होते. दोघांनी अैकमेकांच्या पाठीवर शेपटीनं थाप मारली. " हात्तीच्या, हीच का आकाशवाणी! आणि अिथूनच का रेडिओत आवाज येतात? काय रे पिटक्या, मग आता आपलेही आवाज अैकू येणार तर ! चल अेखादं गाणं तरी म्हणू या. "

असं म्हणून अिटकूनं पिटकूला हाताला धरून ओढत-ओढत दुसऱ्या खोलीत नेलं. त्या खोलीत तर कुणीच नव्हतं. अिटकू–पिटकू ते पाहून खूष झाले. तिथे दोन–चार मोठमोठे भोपळे अुघडेच पडले होते. त्या भोपळ्यांना तारा जोडलेल्या होत्या. पिटकू सरसर त्या तारांवरून वर चढला. पिटकू जसजसा वर चढत होता, तसतसा या तारांतून सुरेख आवाज निघत होता. पिटकूचं ते तंबोरावादन अैकत अिटकू अेका गोलशा डब्यावर चढला, आणि त्यानं मोठ्या खुषीनं आपली शेपटी आपटली आणि– अरे वा ! कसला टण् टण् आवाज झाला. तो अैकून पिटकू ओरडला, " वा ! अिटक्या मार, मार शेपटीचे फटके. अरे, काय मस्त आवाज काढतो आहेस रे! चल, मी हा असाच तारेवर नाचतो न् तू असाच शेपटी आपटत राहा त्या डब्यावर. काय मजा आहे रे अिथं ! "

त्यांचा हा खेळ रंगात आला होता. ते बाकी सर्व गोष्टी

विसरले होते. पण त्यांचं हे तंबोरावादन आणि डग्गा वाजवणं शेजारच्या खोलीत अैकू आलं. काचेतून ते त्या ताअीनं पाहिलं न् ती ओरडली, " ते मेले अुंदीर त्या खोलीत गेलेत. शी! वात आणला बाअी या अुंदरांनी ! कुठून आले देव जाणे ! "

तिचं ओरडणं अिटकू–पिटकूला अैकू आलं. तेही ओरडले, " अरे बापरे, काय जादू आहे रे ही! त्या ताअीला आपण कसे रे. दिसलो? चला, पळा आता अिथून ! "

अिटकू–पिटकूच्या स्वाऱ्या तिथून पळाल्या. त्या आणखी दोन-चार खोल्या हिंडून आल्या. त्यांना त्यांचा बाळ कुठंच दिसेन आता मात्र स्वाऱ्या गडबडल्या. बाळ दिसला नाही तर मग घरी कसं जायचं? पिटकू अिटकूला थप्पड मारीत रडवेला होअून बोलला, " तू ! तुझ्यामुळेच आपण अिथं आलो. आता घरी कसं जायचं ? आणि–आणि आपली आअी कशी –"

पुढचं बोलण्याअैवजी पिटकूला रडू फुटलं. खरं तर अिटकूही मनातून घाबरला होता. पण तसाच धीर धरीत तो पिटकूला म्हणाला, " हे बघ, असा रडू नकोस बुवा! तू तर खरं म्हणजे किती हुषार! आअी तर नेहमी म्हणते, माझा पिटक्या भारी हुषार! "

अिटकूनं असं थोडंसं चढवल्यावर पिटकूबुवा थोडे शांत झाले. मग दोघं अेकमेकांच्या संगतीनं हळुहळू, दबतदबत बाळ कुठं दिसतो का पाहात फिरत राहिले. फिरता–फिरता अेका ठिकाणी त्यांना बाळाचा आवाज अैकू आला. दोघंही ओरडले, " सापडला सापडला! "

आणि त्यांचा तिकडे आवाज अुमटला, " ची! ची! "

पुन्हा अेकदा स्टुडिओत सर्वांचा गोंधळ झाला.

हे अुंदीर दिसत तर नव्हते. पण त्यांनी धुमाकूळ मात्र घातला होता. अिकडे अिटकू-पिटकू बाळाच्या आवाजाच्या रोखानं हळु-हळू निघाले होते. बाळ गोष्ट सांगत होता ती खोली अखेर त्यांना सापडली. पण ती बंद होती. जाणार कसे ते आत ? त्या दाराशी त्यांनी झटापट करून पाहिली, पण ते अुघडेना. अखेर कंटाळून ते तिथेच थांबले. आत जाण्यासाठी चुळबुळ करीत.

शेवटी त्यांची अिच्छा पुरी झाली. दार अुघडून अेक माणूस बाहेर येत होता. अिटकू-पिटकूला आत शिरायला अेका क्षणाचाही विलंब लागला नाही. खोलीत सगळी मुलंचमुलं बसलेली दिसत होती. अिटकू–पिटकू त्या मुलांच्या मधून पळतपळत आपल्या बाळाकडे निघाले. आणि त्या मुलांच्यात अेकदम गोंगाट सुरू झाला. कुणी हसायला लागले, तर कुणी घाबरून रडायला लागले तर मुली 'अी-शी-अगबाअी' अशा ओरडत अुड्या मारायला लागल्या। बाळाजवळ त्याची ताअी व आणखी दोन गृहस्थ बसले होते. त्यांना काही अिटकू–पिटकू दिसत नव्हते. ते मुलांना गप्प बसण्याची खूण करीत होते, आणि मुलं तिकडे लक्ष न देता ओरडत होती, "अुंदीर,अुंदीर आले आहेत दोन ! "

आता अिटकू–पिटकू अगदी बाळाच्या जवळ येअून अुभे होते. बाळाने त्यांच्याकडे पाहताच अिटकू–पिटकू खुषीनं हसले. चांगले मोठ्याने ! ची ! ची ! चू ! चू !

अिकडे बाळ गोष्ट सांगत होता. तिकडे त्याची आअी रेडिओ अैकत होती. मध्येच हा अुंदरांचा आवाज अेकू येताच ती ओरडली, " अगबाअी ! हा कसला मध्येच आवाज काढला यानं? तरी त्याला बजावलं होतं, अिकडे तिकडे कुठं लक्ष देअू नकोस म्हणून ! "

बाळाची गोष्ट पुरी होईपर्यंत अटकू-पिटकू आपापसात हळूहळू बोलत होते. ते अेका कोपऱ्यात लपले होते. कुणाला दिसत नव्हते. खरं तर बाळानंही त्यांना पाहिलेलं नव्हतं. अटकू-पिटकूला मात्र वाटत होतं, बाळानं आपल्याला पाहिलंय आणि तो आपलीच गोष्ट सांगतोय. कारण खरोखरच बाळ गोष्ट सांगत होता दोन अुंदरांच्या पिलांची म्हणजे अटकू-पिटकूचीच. ती गोष्ट अटकू-पिटकू मन लावून अैकत होते, मधून मधून खुशीची पावती देत होते, ' ची ची ची '

आपल्या घरात बसून अेकणारे बालश्रोते म्हणत होते, " वा आज अुंदरांची गोष्ट फार छान झाली रेडिओवर! काय हुबेहूब नक्कल केली त्या मुलानं अुंदराच्या आवाजाची. असं वाटत होतं, दोन अुंदीर खरंच रेडिओवर आले आहेत ! "

आणि बाळाची आअी चिडून म्हणत होती. " काय बाअी, त्या अुंदरांचा सुळसुळाट झालाय. आकाशवाणीवरही धाड गेलीय वाटतं मेल्यांची ! घरी-दारी त्रास आहेच या पिलकुटांचा ! "

बिळाच्या तोंडाशी अटकू-पिटकूची आअी आपली अर्धी-तुटकी शेपटी खोट्याखोट्या रागानं आपटत त्यांच्या बाबांना म्हणत होती, " अैकलात का आवाज ? अहो, आपले अटकू-पिटकूच बोलताहेत हो त्या रेडिओतून ! काय तरी बाअी या कार्ट्यांना म्हणावं ! मी म्हणते, हे असे त्या रेडिओत गेले तरी कसे ? भारीच बाअी द्वाड झालेत ! "

आपल्या पोरांचा तो पराक्रम अैकत बाबा खुषीत हसत होते; आणि अटकू-पिटकू हे सारं आपल्या आअीला कधी सांगतो या धांदलीत बाळाच्या आधीच मोटारीत येअून बसले होते, आपली आकाशवाणीवरची मोहीम संपवून !



बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. ..२६३.. दिनांक
BVBK-0400263